# प्रकरण सहावे

# उ प सं हा र

UNIVER... KOLHAPU...

## प्रकरण सहावे

## उ प सं हा र

प्रस्तुत शोध निबंधात सातारा तालुक्यातील पक्षीय राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे व त्या अनुषंगाने श्री. अभयसिंह राजेभोसले यांचा राजकारणामध्ये उदय कसा झाला व सातारा तालुक्यामध्ये त्यांनी आपले नेतृत्व कसे प्रस्थापित केले याचा अभ्यास केला आहे. १९७७ पर्यंत तालुक्याचे राजकारण श्री. दादासाहेब जगताप यांच्या नियंत्रणाखाली होते. पर्यायाने श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली होते. म्हणजेच १९७७ पर्यंत कॉंग्रेस पक्षाच्या प्रभावाखाली हा सातारा तालुका विधानसभा मतदार संघ होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात मात्र महाराष्ट्राप्रमाणेच सातारमध्येही कॉंग्रेस पक्षाचा पराभव झाला होता व कॉंग्रेस पक्षाचाप प्रभाव कमी झाला होता. पण पुढे महाराष्ट्रात सुरु झालेल्या पंचायत राज्याच्या प्रयोगातून स्थानिक पातळीवरील राजकारणात बदल होत गेले. ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद, सहकारी संस्था यांच्या स्वरुपात सत्तेची केंद्रे निर्माण झाली. या सत्ता केंद्रांना स्थानिक पुढा-यांच्या सत्ता राजकारणात महत्त्व प्राप्त झाले. यातून तालुक्याच्या विकासाचा प्रश्न महत्त्वाचा होता. ते प्रश्न हातात घेऊन श्री.अभयसिंह राजे भोसले यांचा १९७७ मध्ये उदय झाला व त्यांनी आपले नेतृत्व सातारा तालुक्यात रुजविण्या-साठी विकासात्मक अनेक विविध कामे हाती घेऊन सातारा तालुक्यावर आपले नेतृत्व प्रस्थापित केले.

### सारांश:

सातारा तालुक्याचे पक्षीय राजकारणाची ऐतिहासीक पार्श्वभूमीची प्रस्तावना या पहिल्या प्रकरणात सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात दादासाहेब करंदीकर व आळतेकर, मुंबई राज्याचे मंत्री

म्हणून गणपतराव तपासे, भाऊसाहेब सोमण यांचे नेतृत्व लाभले व त्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात सातारा तालुक्याला ॲड. व्ही.एन्. पाटील, बाबूराव घोरपडे, श्री. दादासाहेब जगताप यांचे नेतृत्व लाभले. १९६२ च्या विधानसभेत निवडणूकीनंतर श्री. दादासाहेब जगताप यांचा सातारा तालुक्याच्या राजकारणात उदय झाला. या तालुक्यात त्या काळात अनेक बदल झाले. या सर्व बदलांचा आढावा पहिल्या प्रकरणात घेण्यात आला आहे. थोडक्यात १९६० नंतर राजकारणात त्याच प्रमाणे सातारा जिल्हयातही औद्योगिक विकासात्मक बदल झाले. यशवंतराव चव्हाण हे साताराचे खासदार झाले. परंतु सातारा तालुका विकासाच्या दृष्टीने मागासलेलाच राहिला.

दुसऱ्या प्रकरणामध्ये १९६० ते १९७७ या दरम्यानच्या सातारा तालुक्यात घडलेल्या राजकीय घटनांच्या आधारे तेथील पक्षीय राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. १९६० ते १९७७ या काळात महाराष्ट्राचे राजकारणावर श्री.चव्हाण यांचे वर्चस्व होते व ते पक्षातील सर्व गटांना सांभाळून नेत असत या प्रकरणात सातारा तालुक्यातील विविध राजकीय पक्ष व कॉंग्रेस पक्ष, सातारा तालुक्यातील कॉंग्रेसचपक्षातील गटबाजी. त्यामध्ये यशवंतराव चव्हाणांची भूमिका, सातारा नगरपालिका व पंचायत राज्यसंस्थांचे राजकारण, यांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्या आधारे सातारा तालुक्यातील राजकारणाची वैशिष्टये सांगितली आहेत. १९७७ नंतर केंद्रात राजकीय बदल झाला आणि त्यांचे पडसाद ही तालुक्याच्या राजकारणावर पडले.

प्रकरण तीनमध्ये १९७७ नंतर सातारा तालुक्याच्या राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यावेळी साताऱ्यात राजकीय नेतृत्वात पोकळी निर्माण झाली होती ती कोंडी फोडण्यास १९७७ ची लोकसभा निवडणूक उपयोगाची ठरली. त्यावेळी केंद्रात कॉंग्रेस पक्षाचा दारूण पराभव झाला व विरोधी पक्षाचे नेते म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड झाली. महाराष्ट्रातील लोकसभा निवडणूकीत सातारा लोकसभा मतदार संघात

यशवंतराव चव्हाण विजयी झाले. पण १९७८ च्या निवडणूकीत विरोधी पक्षाचा प्रभाव वाढला. यावेळी सातारा तालुक्यामध्ये जनतापक्ष वाढू लागला श्री. अभयसिंह राजेभोसले यांनी जनता पक्षात प्रवेश केला. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकीत सातारमधून जनता पक्षातर्फे श्री. अभयसिंह राजेभोसले निवडणूकीस उभे राहिले व निवडून आले या प्रकरणात श्री. अभयसिंह राजेभोसले यांच्या विजयाची कारणे महाराष्ट्रात पुलोद सरकारची स्थापना, शरद पवारांचे मंत्रीमंडळ इत्यादी बाबी चर्चील्या आहेत. परंतु १९७९ ला केंद्रातील जनता पक्षाचे सरकार कोसळले व त्याचा परिणाम जनतापक्षावर झाला. हळूहळू तो पक्ष अस्तास जाऊ लागला.

प्रकरण चार मध्ये नेते श्री. अभयसिंह राजेभोसले यांच्या उदयाची चर्चा करण्यात आली आहे. जनता पक्षाचा अस्त झाला व केंद्रात १९८० ला लोकसभेच्या मध्यावधी निवडणूका घेण्यात आल्या. त्यामध्ये सातारा लोकसभा मतदार संघामध्ये यशवंतराव चव्हाण अरस कॉंग्रेस तर्फे उभे राहून विजयी झाले. परंतु केंद्रात कॉंग्रेस (आय) चे सरकार भरघोस मतांनी निवडून आले. त्याच दरम्यान महाराष्ट्रातील पुलोद सरकार बरखास्त करण्यात आले व महाराष्ट्रात नव्याने १९८० ला विधानसभेच्या निवडणूका घेण्यात आल्या. सातारा तालुका मतदार संघातून श्री. अभयसिंह राजेभोसले यांनी कॉंग्रेस (आय) मध्ये प्रवेश केला कॉंग्रेस (आय) तर्फे ते निवडून आले. व अंतुले यांच्या मंत्री मंडळात १९८० लापहिल्यांदा गृहराज्यमंत्री म्हणून समाविष्ट झाले. मंत्री झाल्यानंतर सातारा तालुक्याच्या विकासासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले. आपले नेतृत्व सातारा तालुक्यात रुजविण्यासाठी त्यांनी अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याची स्थापणा केली व त्या कारखान्याच्या माध्यमातून अनेक सहकारी संस्था उभ्या करुन तालुक्याच्याविकासाला गती दिली. त्यामध्ये सहकारी साखर कारखाना, अजिंक्य महिला बँक, अजिंक्य बझार, जलसिंचन योजना, औद्योगिक वसाहत इ. संस्थांची स्थापना करुन तालुक्याचा

तालुक्याचा विकास केला. व तालुक्यात आपले नेतृत्व उभे केले. व तालुक्यात आपले त्यांनी नेतृत्व कसे प्रस्थापित केले याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

प्रकरण पाचमध्ये सातारा तालुक्यातील राजकारणाचा टीकात्मक अभ्यास करण्यात आला आहे. स्थानिक राजकारणाचे तीन विभागात कार्य चालू असते हे तीन विभाग म्हणजे राज्यस्तरावरचे पंचायती राज्य संस्थांचे राजकारण व सहकारी संस्थांचे राजकारण या तिन्ही विभागाचा सातारा तालुक्यातील स्थानिक पातळीवरील पक्षीय राजकारणावर कसा प्रभाव पडला यांचा अभ्यास करणेत आला आहे. राज्य व केंद्र स्तरावरच्या राजकीय बदलांचे स्थानिक राजकारणावर प्रभाव पडतो स्थानिक राजकारणात श्री. अभयसिंह राजेभोसले यांचा उदय कसा झाला याचा टीकात्मक व अभ्यास करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे तालुका पातळीवर नेतृत्वाला आपले राजकीय बस्तान बसविण्यासाठी विविध विकास कामांच्याकडे लक्ष कशा प्रकारे द्यावे लागते त्याचे नेतृत्व कसे रुजते याचाही टीकात्मक अभ्यास आहे. श्री. अभयसिंह राजेभोसले यांच्या नेतृत्वाची वैशिष्टये सांगण्यात आली आहेत.

## काही महत्त्वाचे निष्कर्ष:

सातारच्या पक्षीय राजकारणाचा अभ्यास स्थानिक पातळीवर चाललेल्या राजकारणाची गतिमान तत्त्वे जाणण्यासाठी करण्यात आला आहे. गेल्या २५ वर्षांच्या राजकारणाचा आढावा घेत असताना आपणास हे जानवते की स्थानिक राजकारणाचा मुख्य आधार हा त्या नेतृत्वाने केलेली विकासाची कामे हा आहे. त्यासाठी राजकीय पक्षाचा आधार हवा असतो. पक्षीय राजकारण हे सातारा तालुक्यामध्ये थोडया फार प्रमाणामध्ये गटबाजीचा आधार घेऊन पुढे जाताना दिसते. तालुक्याचा काही प्रमाणात राजकीय व आर्थिक विकास होत असताना त्यातुन तालुक्याचा विकास करणारे नेतृत्व पुढे आले.

सातारा मतदार संघातील पक्षीय राजकारणाच्या अभ्यासाचे निष्कर्ष थोडक्यात खालील प्रमाणे सांगता येतील.

१) सातारा तालुक्यातील नेतृत्वाचा उदय आणि विकास विधान सभेच्या निवडणूकांच्या आधारे होताना दिसतो. श्री. जगताप व नंतर श्री.अभयसिंह राजेभोसले यांनी आपल्या नेतेपणाची सुरुवात विधानसभा निवडणूक जिंकूनच केली.

२) श्री. अभयसिंह राजेभोसले यांनी आपले नेतृत्व क वरुन खाली बांधीत आणले असे नेतृत्व क्वचितच दिसते. श्री. राजेभोसले यांनी इतर अनेक पुढाऱ्यांप्रमाणे पंचायत समिती किंवा सहकारी साखर कारखाना यामधून आपले नेतृत्व प्रस्थापित केले नाही. तर ते प्रथम एकदम विधान-सभेत निवडून आले व मंत्री झाल्यावर नेतृत्व वरुन खाली बांधत आणलेले आपणास दिसते.

३) श्री.अभयसिंह राजेभोसले यांनी आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी, वाढविण्यासाठी त्याचप्रमाणे विरोधी पक्षाची सत्ता कमकुवत करण्यासाठी सातारा तालुक्यात अनेक विध विकास कामांना फार मोठी चालना दिली आणि तेथे निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरुन काढली.

४) साताऱ्याच्या राजकारणावर जिल्हा, राज्य, केंद्र येथील राजकारणाचा प्रभाव अपरिहार्यपणे पडताना दिसतो. परंतु तरीही स्थानिक राज-कारणात व्यक्तिगत नेतृत्व निर्णायक ठरताना दिसते. नव्या नेतृत्वाच्या उदयास राज्यातील व केंद्रातील बदलती राजकीय परि-स्थिती उपकारक ठरली.

५) सातारा तालुक्यातील राजकारणात सतत सत्ताधारी एकाच पक्षाचे नेतृत्व दिसते व त्या पक्षाला विरोध करणारे विरोधी पक्ष नगण्य आहेत त्यामुळे पक्षांतर्गत गटबाजी मोठया प्रमाणात आहे.

६) श्री. अभयसिंह राजेभोसले यांनी तालुका नेतृत्वात जी पोकळी निर्माण झाली होती ती भरुन काढली आणि कॉंग्रेसच्या अंतर्गत राजकारणातील गटबाजीला तोंड देत, प्रसंगी लाभ उठवीत त्यांनी राज्याच्या राजकारणात मजल मारली. त्यांच्या पाठीमागे पक्ष संघटना राजकीय संस्था व प्रस्थापित नेता उभा नसतानाही त्यांनी राजकारणात आलेल्या संधीचा फायदा घेत राज्यमंत्री मंडळात सहकार मंत्री होण्यापर्यंत प्रगती केली. श्री. अंतुले शारद पवार यांच्या काळात निर्माण झालेल्या नव्या व्यावसायिक पुढा-यांचे ते प्रतिनिधी आहेत.

......